# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार एक व अनुकंपा तत्वावर आठ दिवंगत कर्मचाऱ्यांच्या वारसांना मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.**

दिनांक ११ जुलै २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार एक व अनुकंप तत्वावर आठ दिवंगत कर्मचाऱ्यांच्या वारसांना महानगरपालिकातर्फे नियुक्ती पत्र देण्यात आले. प्रसंगी अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त (मुख्यालय) रवि पवार उपस्थित होते.

लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार मा. आयुक्त यांच्या हस्ते रोहित चंडालिया यांना सफाई कामगार पदी नियुक्ती पत्र देण्यात आले. त्याचबरोवर अनुकंप तत्वावर लिपिक टंकलेखक या पदी भावेश सुहास लोकेगावकर व मृणाली विक्रांत पाटील यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. सफाई कामगार या पदी अलीकाडेश्वरी बाळमुर्गन, मनिषा तुषार समेळ, शक्तीवेल मुत्तूलिंगम, विजय विश्वनाथ स्वामी, संतोष रामा सोनावणे तर शिपाई या पदावर साक्षी महेंद्र बरफ यांना नियुक्ती पत्र देऊन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिले.